# या प्रगतीच्या युगात सर्वकाही घडतंय
# पण माणूस यथार्थ माणूस बनत नाही

**- निरंकारी माता सविंदर हरदेव जी**

*(संत निरंकारी मिशनच्या तत्कालीन सद्‌गुरु माता सविंदर हरदेवजी दिनांक ५ ऑगस्ट, २०१८ रोजी ब्रह्मलीन झाल्या. मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी आपले अवघे जीवन वेचले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्याच पावन प्रवचनातील काही अंश इथे प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. वाचकांना तो निश्चितच उद्बोधक ठरेल अशी आशा आहे.)*

प्रस्तुती - स.वि.लव्हटे (मुंबई)

कुठेतरी एक ओळ वाचनात आली, की या प्रगतीच्या युगात सर्वकाही घडत आहे; पण आश्चर्याची बाब म्हणजे माणूस खऱ्या अर्थाने माणूस बनत नाही.

जगाची स्थिती अशी झाली आहे, की नर आणि मानव यांना एक मानता येत नाही. केवळ नरतन धारण करणे म्हणजे मानव होणे नव्हे. कारण अलिकडे जेवढी भौतिक प्रगती होत चालली आहे तेवढाच स्वार्थीपणा वाढत चालला आहे. मनुष्य आपमतलबी झाला आहे. Man has become a dangerous machine it's like cannibal eating with a fork. (एकप्रकारे मनुष्य काट्या-चमच्याने आहार घेणारे घातक नरभक्षी मशीन बनला आहे).

अशा काळात केवळ भौतिक प्रगती पुरेशी नाही. त्याबरोबरच आध्यात्मिक प्रगतीही अनिवार्य आहे.

काही दिवसांपूर्वी दोन फुलदाण्या समोर आल्या. एकीवर लिहिले होते - crystal glass तर दुसरीवर normal glass. दिसायला दोन्ही सारख्याच वाटत होत्या; पण जेव्हा फरक विचारला तेव्हा म्हणाले, "crystal glass" जर आपण उजेडाकडे ठेवला तर त्यातून एक Prism (त्रिकोणी लोलक) दिसतो आणि ते दृश्य फार सुंदर वाटते. त्याच्या वरच्या काठावर ओले बोट फिरवले तर त्यातून एक संगीत बाहेर पडते. त्या काचेच्या कडा अगदी गुळगुळीत असतात, बोचत नाहीत. आपण जेव्हा या दोन प्रकारच्या फुलदाण्या उचलून घेऊ तेव्हा त्यातील crystal ची फुलदाणी वजनदार असल्याचे जाणवते. यावरुन हे लक्षात येते, की संत-महापुरुषदेखिल बाह्यांगाने सर्वसामान्यांसारखेच दिसतात; परंतु त्यांची हृदये कोमल असतात, ते कधीही कोणाचे मन दुखवत नाहीत, समर्पित भावाने प्रभुइच्छेत राहतात. सर्वांना प्रेम देता यावे, सर्वांना याविषयी समजावता यावे, ज्यायोगे सगळे एकोप्याने प्रेम व नम्रतेने राहावेत, हाच त्यांचा उद्देश असतो.

माणसाच्या अंतरात जी एक Unique quality (अद्वितिय गुणवत्ता) असायला हवी ती आहे 'सहनशीलता' तसेच एकमेकाच्या दु:खामध्ये मदत करणे, त्यांच्याप्रति सहानुभूती दाखवणे, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेणे, कोणाला दु:ख न देणे हे मानवी गुण होत. मात्र, आजचा मनुष्य सहानुभूती दर्शवणे तर दूरच राहो, उलट इतरांना त्रास होईल, त्यांच्या समस्या वाढतील अशाच गोष्टी करतो.

असंही एक वचन लहानपणापासून श्रवण करत आलो आहोत, की God made man in his own image (अर्थात् ईश्वराने मानवाला आपले स्वरुप देऊन बनविले आहे.) परंतु आजचा मनुष्य स्वत:ला ईश्वर समजू लागला आहे. त्याला इतका अभिमान झाला आहे, त्याच्यामध्ये इतका अहंकार भरलेला आहे, की तो कोणाचे दोन शब्द ऐकायला तयार नाही. मग त्याला कोणीही कितीही समजावले तरी मानत नाही. कारण तो स्वत:ला खूपच शहाणा समजत असतो. अशा अहंकारी मानवामध्ये ईश्वराची छबी कुठून दिसावी?

संत-महात्म्यांनी सदोदित प्रेम-प्रीतीचाच पाठ शिकवला, बंधुभाव, मानवतेचाच धडा दिला. ज्या भक्तांनी तो केवळ श्रवणच केला नाही, तर आचरणात आणला त्यांच्यासाठी हे वचन आहे - God made man in his own image. संतांनी तर इथपर्यंत सांगितलं, की मला वाईटाच्या बदल्यातही चांगल करता यावं. ज्यांनी अशा भावना अंगिकारल्या त्यांचे जीवन महान बनले.

अशी नेकीची, प्रेमाची भावना मनामध्ये तेव्हाच उत्पन्न होते जेव्हा ब्रह्मज्ञान प्राप्त करुन कणाकणामध्ये या निराकार प्रभुचे दर्शन होते. मग तो सज्जन प्रत्येक मानवाला ईश्वराचे रुप समजू लागतो. त्याचेच जीवन सुखी बनते आणि त्याचा इहलोक व परलोक सावरतो.

जर एखाद्याची नजर कमजोर असेल तर तो मनुष्य डोळयांच्या डॉक्टरकडे जातो. डॉक्टर त्याचे डोळे तपासून एक नंबर देतो आणि सांगतो, की या नंबराचा चश्मा बनवून घ्या. तसा चश्मा लावल्याबरोबर त्याला आधी जे अंधुक दिसत होते ते आता स्पष्ट दिसू लागते. आता एखाद्याने डॉक्टरकडून डोळे तपासून घेतले आणि चश्माही बनवून घेतला; पण तो लावलाच नाही तर त्याला पूर्वीसारखेच अंधुक दिसत राहील. त्यामध्ये डॉक्टरचा किंवा चश्म्याचा दोष नाही.

आता दुसऱ्या बाजुला एखादा व्यक्ती आंधळा असेल आणि त्याने आपल्या मर्जीने कितीही मोठ्या भिंगाचा चश्मा लावला तरी त्याला काहीच दिसणार नाही. अशाच प्रकारे ज्ञानदृष्टीच्या अभावी कितीही वेदग्रंथ-शास्त्रांचे पठन केले तरी त्याचा बोध होणार नाही. ज्ञानदृष्टी मिळाल्यानंतर सहजच वेदग्रंथ आम्हाला ज्ञानरुपी मार्गावर चालण्याची ग्वाही देतात.

बाबाजींचा World Without Walls (भिंती विरहित जग) चा दृष्टीकोन आणि Oneness "एकत्व"चा संदेश आठवला तर त्यामध्ये त्यांनी हेच समजावले की, ज्यादिवशी मनुष्य हे समजू लागेल, की आपण सर्व एकाच प्रभुची लेकरं आहोत तेव्हा या समस्त भिंती जमिनदोस्त होतील. या भिंती काचेच्या भिंतीसारख्या आहेत ज्यामधून आपण एकमेकाला पाहू शकतो पण एकमेकांपर्यंत जाऊ शकत नाही आणि जाऊ इच्छितही नाही. आपला वृथा अभिमान आणि लहान मोठ्या कारणांवरुन आपण या भिंती उभ्या करत आहोत. ज्या समस्या प्रेमाने आणि माफी मागण्याने सुटू शकतात त्या आम्ही करु इच्छित नाही. कारण आम्ही माफी मागूही इच्छित नाही आणि माफी करुही इच्छित नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण बाबाजींची शिकवण, मिशनची शिकवण समोर ठेवली तर आमच्या मनामध्ये सर्वांप्रति प्रेम, आदर आणि विनम्र भाव उपजेल आणि "भिंती विरहित विश्व"चा बाबाजींचा संदेश जगभर पोहचवता येईल.

****************